**<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. ८८/२०१६</u>** **निशाणी ४९ च्या पुढे**

<u>परिस एकनाथ खाडे वि. एकनाथ विठ्ठल खाडे</u>

**<u>पुढील उलटतपास वादीतर्फे श्री. सी. आर. घुगे अधिवक्ता</u>**

मी अंगणवाडीत सेविका म्हणुन कार्यरत होते. मी पुर्वीपासुन खंबाळे येथे राहण्यास आहे. प्रतिवादी क्र. ०१ हा माझा पुतण्याचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनिषा हिचे लग्न झाले त्यावेळी ती नोकरीस होती. हे म्हणणे खरे आहे की, मनिषा खंबाळे येथे नांदण्यास आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मनिषा शिक्षिका म्हणुन नोकरीकामी बाहेर वास्त्यवास होती. मनिषा कधीकधी सासरी येत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी मनिषा चिडखोर असल्याचा मजकुर खोटा लिहिला आहे. मनिषा व एकनाथ यांचे दरम्यान झालेल्या समजुत पत्रातील अटी शर्ती मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे व मनिषाचे माहेर एक आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे माहेरचे व मनिषाच्या माहेरचे यांचेदरम्यान वाद असल्याने तिचे विरोधात साक्ष देण्यास आली आहे. एकनाथ व मनिष यांना परिस नावाचा मुलगा आहे व एकनाथच्या मिळकतीमध्ये त्याचा वाटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोट्या मजकूराचे सरतपासणी प्रमाणपत्र दाखल करुन आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR

Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2026.04.18 13:40:48 +0530

**(लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सिन्नर.

दि. १८/०४/२०२६